जिल्हा परिषदेतील चतुर्थश्रेणी शिपाई संवर्गातील पुरुष कर्मचाऱ्यांना पांढऱ्या रंगाचा गणवेश देण्याबाबत[illegible] कार्यपद्धती.

महाराष्ट्र शासन,
शासन निर्णय क्रमांक- बैठक-२००२/ प्र.क्र. २५१/ आस्था-५,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक - ७ डिसेंबर, २००४.

संदर्भ :-

१) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्रमांक डीएसआर-४६८९/ सीआर-२९१/१८, दिनांक २० जून, १९८९.

२) शासन निर्णय,ग्राम विकास व जलसंधारण विभाग,क्रमांक डीएसआर-२४९०/सीआर-३३१, दिनांक २.२.१९९१.

३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्र.संकीर्ण-१००१/३०५४/प्र.क्र.२१/ २००२/२९, दिनांक १६ जानेवारी, २००३

४) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्रमांक बैठक-२००२/प्र.क्र.२५१/आस्था-[illegible], दिनांक १५ जुलै, २००३.

जिल्हापरिषदेतील चतुर्थश्रेणी पुरुष कर्मचाऱ्यांना पांढऱ्या रंगाचा गणवेश देण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय या विभागाने घेतला असून त्याबाबतचे आदेश या विभागाच्या अनुक्रमांक (४) येथील दिनांक १५ जुलै, २००३ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले आहेत. त्याच दिनांकाच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ७ मध्ये पांढऱ्या रंगाचा गणवेश पुरविण्याबाबत स्पष्ट कार्यपध्दती संदर्भातील आदेश वेगळ्याने निर्गमित करण्यात येतील असे नमूद केलेले आहे.

सर्व शासकीय कार्यालयातील शिपाई संवर्गातील कर्मचाऱ्यांना पांढऱ्या रंगाचा गणवेश देण्याबाबतचे आदेश सामान्य प्रशासन विभागाने अनुक्रमांक (३) येथील त्यांच्या दिनांक १६ जानेवारी, २००३ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित केले आहे. तथापि, वरील आदेश शासकीय कर्मचा-यांसाठी असल्याने ते या विभागाच्या अधिनस्त संबंधित जिल्हापरिषद कर्मचाऱ्यांना आता लागू करण्यात आले असून त्यासाठी पांढऱ्या रंगाचा गणवेश पुरविण्याबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

वरील सर्व बाबी विचारात घेऊन, तसेच या संदर्भातील पूर्वीच्या सर्व आदेशांचे अंशत: अधिक्रमण करुन महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम २४८ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीनुसार शासन या संदर्भात पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

१) सबरहू गणवेशासाठी लागणाऱ्या कापडाची खरेदी शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक शासखा-१०८८/ २५१८/उद्योग-६, दिनांक २ जानेवारी, १९९२ मधील परिच्छेद ५(अ)(२) ला अनुसरुन परिच्छेद-३ मधील तरतूदीनुसार करण्यात यावी.

२) जिल्हापरिषद शिपाई संवर्गातील चतुर्थश्रेणी पुरुष कर्मचाऱ्यांना दिनांक १५ जुलै, २००३ च्या या विभागाच्या शासन निर्णयानुसार पांढऱ्या टेरिकॉटचे कापड पुरविण्यात येईल त्यावेळी संबंधित कर्मचाऱ्यांनी

बुशशर्ट शिवण्यासाठी पुरविलेल्या कापडातून अर्ध्या बाहयांचेच बुशशर्ट शिवणे व नंतर कार्यालयीन वेळेत परिधान करणे सक्तीचे करण्यात येत आहे.

३) संबंधित कर्मचाऱ्यांनी कार्यालयात आल्यानंतर पूर्ण वेळ गणवेश परिधान करणे आवश्यक राहील. या सूचनेचे काटेकोरपणे पालन न झाल्यास व कार्यालयीन वेळेत गणवेश परिधान न करणाऱ्या संबंधित जिल्हापरिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांवर महाराष्ट्र जिल्हा परिषद सेवा (शिस्त व अपील) नियम १९६७ मधील नियम ३ नुसार शिस्तभंगाची कार्यवाही संबंधित जिल्हापरिषदेने करावी.

४) जिल्हा परिषदेतील संबंधित कर्मचाऱ्यांना गणवेष शिलाईसाठी प्रतिजोडी, प्रति कर्मचारी राज्यातील महापालिका क्षेत्रात रुपये १००/- व इतर सर्व ठिकाणी प्रतिजोडी, प्रति कर्मचारी दर रुपये ८०/- असा मर्यादित राहील. त्यामुळे प्रत्यक्ष जेवढ्या कर्मचाऱ्यांना संबंधित जिल्हा परिषदेने गणवेश दिले असतील त्या सर्व कर्मचाऱ्यांना वरील दराने शिलाई दिल्यास त्यापोटी होणारा एकूण खर्च अनुज्ञेय राहील.

५) या कर्मचाऱ्यांना द्यावयाच्या धुलाई भत्त्या संबंधीचे आदेश या विभागाने काढलेल्या शासन आदेश क्रमांक डीएसआर-३६९३/प्र.क्र.१०६४/१९, दिनांक ३ ऑगस्ट, १९९३ अन्वये नमूद केल्याप्रमाणे अनुज्ञेय असतील.

६) यासाठी होणारा संपूर्ण खर्च अनुक्रमांक (४) येथील या विभागाच्या दि.१५-७-२००३च्या शासन निर्णयाच्या परि.६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषदेने स्वतःच्या उत्पन्नातून करावा.

हे आदेश सामान्य प्रशासन विभागाने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.अनौसं-४९-२९, दि.२६.७.२००४ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( प्र. र. जोशी )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
१) महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई.
२) महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर
३) सामान्य प्रशासन विभाग, का.क्र.२९, मंत्रालय, मुंबई.
४ वित्त विभाग, (व्यय-१५), मंत्रालय, मुंबई.
५) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) उद्योग संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७) सर्व विभागीय आयुक्त
८) सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
९) सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (पाच प्रती)
१०) मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई.
११) निवड नस्ती, कार्यासन आस्था-५, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२